# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.11.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीमध्ये मतदारांचा महायुतीला कौल; भाजपाला सर्वाधिक 132 जागांवर यश
- महाविकास आघाडीला मोठा फटका; अनेक दिग्गजांनाही पराभवाचा धक्का
- महाराष्ट्रातला महायुतीचा विजय हा विकास, सुशासन आणि सामाजिक न्यायाचा विजय असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिक्रिया
- नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रवींद्र चव्हाण विजयी
  आणि
- बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यात दुसऱ्या दिवसअखेर भारताला 218 धावांची आघाडी

**निकाल**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुतीला घवघवीत यश मिळालं असून भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. महायुतीतल्या प्रमुख घटक पक्षांना 230 पेक्षा जास्त जागांवर विजय मिळाला आहे. त्यात भाजपा 132, शिवसेना 57 आणि राष्ट्रवादी काँग्रेसला 41 जागांवर विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीला या निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. कॉंग्रेसला केवळ 16 जागांवर विजय मिळवता आला, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 20, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला फक्त 10 जागा मिळाल्या. पश्चिम महाराष्ट्रातल्या 6 जिल्ह्यात महायुतीचंच वर्चस्व राहिलं. पुणे जिल्ह्यात 21 जागांपैकी 18 जागा, अहिल्यानगर जिल्ह्यात 12 जागांपैकी 8, सातारा जिल्ह्यातल्या आठही जागा, कोल्हापूरातल्या सर्व 10 जागा, सांगली जिल्ह्यातल्या 5 जागा महायुतीला मिळाल्या. सोलापूर जिल्ह्यात 11 जागांपैकी महायुतीला 4 जागा मिळाल्या. महाविकास आघाडीला सोलापुरात 7, पुणे जिल्ह्यात 2, सांगली जिल्ह्यात 3 जागा मिळाल्या आहेत. मुंबई आणि कोकण विभागातही महायुतीनं निर्विवाद वर्चस्व मिळवलं. एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या कोकणानं उद्धव ठाकरे यांना फारसा प्रतिसाद दिलेला नाही. मुंबई

शहर मधून महायुतीला 3 जागा मिळाल्या तर मुंबई उपनगरमधून 19 जागांवर महायुतीनं वर्चस्व राखलं. मुंबई शहर मध्ये महाविकास आघाडीला 7 जागा मिळाल्या. रायगड जिल्ह्यात 7, रत्नागिरी जिल्ह्यात 4, सिंधुदुर्गमध्ये 3, ठाण्यात 16, आणि पालघरमध्ये 5 मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले.मराठवाड्यातही महायुतीचा वरचष्मा राहिला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नऊ, जालना जिल्ह्यात पाच, नांदेडमधल्या नऊ, हिंगोली परभणीमध्ये प्रत्येकी तीन, बीडमधे पाच, लातूरमधल्या पाच मतदारसंघात महायुती विजयी झाली आहे. तर महाविकास आघाडीनं बीड, लातूर आणि परभणी जिल्ह्यात प्रत्येकी एका ठिकाणी विजयी मिळाला आहे. धाराशिव जिल्ह्यात दोन्ही आघाड्यांना प्रत्येकी दोन जागांवर यश मिळालं आहे. उत्तर महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातल्या सर्व अकरा, धुळे जिल्ह्यात पाच, नंदूरबार जिल्ह्यात तीन जागांवर महायुतीला यश मिळालं. विदर्भातही महायुती यशस्वी ठरली. अमरावती जिल्ह्यात आठ पैकी सात जागांवर महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. यवतमाळ जिल्ह्यात पाच, भंडारा गोंदिया जिल्ह्यात सात पैकी सहा, वाशिममध्ये 3, बुलढाणा जिल्ह्यात 6 जागा, गडचिरोली जिल्ह्यात 2, अकोला  आणि नागपूर जिल्ह्यात 4 मतदारसंघात महायुतीला विजय मिळाला.

**पुणे निकाल**

पुणे शहर आणि जिल्ह्यातही महायुतीनं वर्चस्व मिळवलं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातल्या 11 पैकी 10 मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. वडगांव शेरीची एक जागा महाविकास आघाडीला मिळाली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही मतदारांनी महायुतीच्या बाजूने कौल दिला असून 10 पैकी 8 जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत. एक जागा महाविकास आघाडीला मिळाली तर एक जागा अपक्ष उमेदवारानं जिंकली. या निवडणुकीत अनेक लढती लक्षवेधी ठरल्या; त्या ठिकाणच्या निकालाची संपूर्ण राज्याला उत्सुकता होती; ऐकुया याबाबतचा हा वृत्तांत

विधानसभा निवडणुकांमध्ये राज्यातील जनतेला आपापल्या मतदारसंघात काय निकाल लागतात याची जशी उत्सुकता होती तसंच इतर काही जागांच्या निकालांकडेही विशेष लक्ष लागलं होतं. त्यामध्ये अर्थातच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघांचा समावेश होता. ठाण्याच्या कोपरी पाचपाखाडी या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विजयाची सर्वांना जरी खात्री होती तरी ते किती मताधिक्य घेतात याबद्दल औत्सुक्य होतं. अपेक्षेप्रमाणे एक लाखांहून अधिक मताधिक्य घेऊन त्यांनी सहजगत्या विजय मिळवला. राज्यात महायुतीला मिळालेल्या विजयात सर्वात मोठा वाटा असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर नैऋत्यमध्ये जवळपास 40 हजारांच्या मताधिक्य मिळवून आपली जागा राखली. यावेळच्या निवडणुकीत सर्वात जास्त उत्कंठा  होती ती बारामतीच्या जागेबद्दल. महाविकास आघाडीतून बाहेर पडून युतीशी हातमिळवणी करून सरकारमध्ये सामील झाल्यामुळे अजित पवार यांच्यासाठी ही निवडणूक  प्रतिष्ठेची बनली होती. त्यातच सहा महिन्यांपूर्वीच

पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत बारामतीमधून त्यांच्या पत्नीचा पराभव झाल्यामुळे विधानसभेलाही त्याचीच पुनरावृत्ती होईल का अशी शंका कित्येकांना होती. काकांविरुद्ध बंड पुकारून स्वतःची वेगळी चूल मांडणाऱ्या अजित पवारांना प्रतिस्पर्धी म्हणून सख्ख्या पुतण्याचंच आव्हान होतं. त्यामुळे काका विरुद्ध पुतण्याच्या लढतीत अजित पवार यांनी बाजी मारली. पूर्वीच्या एकसंध शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबईतल्या मतदारसंघांमध्ये वरळी, माहीम या मतदारसंघाची विशेष चर्चा होती. याचं कारण माजी मंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे दुसऱ्यांदा वरळीमधून तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माहीममधून पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. या दोन्ही ठिकाणी तिरंगी लढती झाल्या. यात आदित्य ठाकरे यांनी 2019 च्या विजयाची पुनरावृत्ती केली. पण अमित ठाकरे यांना पदार्पणात यश मिळवता आलं नाही. या खालोखाल प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सांभाळणारे भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे काँग्रेसचे नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील या नेत्यांच्या भवितव्याबद्दलही बरीच उत्सुकता होती. बावनकुळे विदर्भातल्या कामठी मतदारसंघातून विजयी झाले तर नाना पटोले विदर्भातल्याच साकोलीमधून 208 मतांच्या निसटत्या फरकानं निवडून आले आहेत. जयंत पाटील यांनी इस्लामपूरची आपली जागा राखली आहे. मावळत्या विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनाही ब्रह्मपुरीची जागा राखण्यात यश आलं आहे. राज्यात काही उमेदवार असे होते ज्यांचा विजय जवळपास निश्चित होता फक्त ते लाख मतांची आघाडी घेतात की हजारांची एवढीच काय ती उत्सुकता होती. एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजयी झालेल्या या उमेदवारांमध्ये भाजपाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धनंजय मुंडे यांचा समावेश आहे. यंदाच्या निवडणुकीत एकाच घराण्यातले, नात्या गोत्यातले उमेदवारही लक्षणीय प्रमाणात रिंगणात उतरले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या धर्मराव बाबा अत्राम यांच्या अहेरी मतदारसंघात त्यांची कन्याच निवडणुकीत त्यांची प्रतिस्पर्धी होती. यात धर्मराव बाबा अत्राम यांना यश आलं. कोकणातल्या कणकवली आणि कुडाळ मतदार संघांमध्ये निलेश आणि नीतेश या राणे बंधूंनी शिवसेना आणि भाजपकडून निवडणूक लढवली. त्यांच्याबरोबरच कोकणातल्याच रत्नागिरी जिल्ह्यातले उदय आणि किरण सामंत हे भाऊही आता नव्या विधानसभेत आमदार म्हणून दिसणार आहेत. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे पुत्र अमित आणि धीरज देशमुख लातूर शहर आणि लातूर ग्रामीण या दोन मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर उभे होते. पैकी अमित यांना यश आले तर धिरज पराभूत झाले. राज्यातले ज्येष्ठ नेते डॉ. विजयकुमार गावीत नंदूरबारमधून भाजपचे आमदार निवडून आले पण भाजपतून बाहेर पडून अपक्ष म्हणून अक्कलकुव्यातून निवडणूक लढवणारी त्यांची कन्या माजी खासदार डॉ. हीना गावीत यांना पराभव चाखावा लागला.

**पराभूत उमेदवार**

विधानसभेच्या या निवडणुकीत राज्यातल्या मतदारांनी अनेक प्रस्थापितांना पराभवाचा धक्का दिला आहे. विजयाची अपेक्षा बाळगून असणाऱ्या काही प्रमुख नेत्यांचाही मतदारांनी अपेक्षाभंग केला. ऐकुयात याबाबतचा हा वृत्तांत

गेल्या निवडणुकीत मतदारांनी निवडून दिलेल्या परंतु यावेळी संधी न दिलेल्या आमदारांमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात संगमनेर मतदारसंघातून पराभूत झाले. कराड दक्षिण मतदारसंघात पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह कसब्यातून रविंद्र धंगेकर, भोरमधून संग्राम थोपटे, जालन्यातून कैलास गोरंट्याल, मलकापूरमधून राजेश एकाडे, पुरंदरमधून संजय जगताप, लातूर ग्रामीण मतदारसंघात धीरज देशमुख यांचा पराभव झालेल्या प्रमुख उमेदवारांमध्ये समावेश आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रकाश फातर्पेकर चेंबूरमधून, कुडाळमधून वैभव नाईक, नेवासामधून शंकरराव गडाख, राजापूरमधून राजन साळवी, भांडुप पश्चिम मतदारसंघात रमेश कोरगांवकर, या निवडणुकीत पराभूत झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या काही नेत्यांनाही मतदारांनी नाकारलं आहे. यामध्ये शिराळा मतदारसंघातले मंगेश नाईक, राहुरीचे प्राजक्त तनपुरे यांचा समावेश आहे. राजेश टोपे यांचा घनसावंगी मतदारसंघात निसटता पराभव झाला. सत्ताधारी शिवसेना, भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याही काही नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. चंदगड मतदारसंघात राष्ट्रवादीच्या राजेश पाटील यांचा, शिवसेनेच्या राजेंद्र राऊत यांचा बार्शीतून तर यामिनी जाधव यांचा भायखळ्यातून पराभव झाला. भाजपाचे कृष्णा गजबे आरमोरीतून, राम सातपुते माळशिरसमधून भाजपातून शिवसेनेत गेलेल्या शायना एन. सी. यांचा मुंबादेवी मतदारसंघातून पराभव झाला.सांगोला मतदारसंघात शिवसेनेच्या शहाजीबापू पाटील यांचा शेकापच्या बाबासाहेब देशमुखांनी पराभव केला. वरळीत शिवसेनेचे मिलिंद देवरा पराभूत झाले. तर इंदापूर मतदारसंघात हर्षवर्धन पाटील यांना याहीवेळी विजय मिळवता आला नाही. अचलपूर मतदारसंघात प्रहार जनशक्ती पार्टीच्या बच्चू कडूंचा भाजपाच्या प्रवीण तायडेंनी पराभव केला. मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे नवाब मलिक यांना पराभूत करुन अबू आझमी पुन्हा निवडून आले.

**पंतप्रधान**

महाराष्ट्रात महायुतीला मिळालेला दणदणीत विजय हा विकासवादाचा, सुशासनाचा आणि सामाजिक न्यायाचा विजय आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. महाराष्ट्र विधानसभा आणि विविध राज्यातल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकांमध्ये भाजपाला मोठं यश मिळाल्यानंतर भाजपाच्या दिल्लीतल्या मुख्यालयात काल विजयोत्सव साजरा करण्यात आला; त्यावेळी ते कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. महाराष्ट्रात असत्याचा, घराणेशाहीचा, नकारात्मक विचारांचा पराभव झाला आहे; महाराष्ट्रानं विकसित भारताच्या संकल्पाला आणखी बळकट केल्याचं या यशातून सिद्ध होतं, असं मोदी म्हणाले.

**सत्ताधारी प्रतिक्रिया**

महायुतीच्या या विजयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मुंबईत एकत्रित पत्रकार परिषद घेत जनतेचे आभार मानले. राज्यातल्या विकास कामांना दिलेलं प्राधान्य, समाजातील सर्व घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजना आणि महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकत्रितपणे केलेलं काम यामुळे महायुतीला हे यश मिळाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. तर संपूर्ण महाराष्ट्रानं महायुतीला दिलेल्या या अभूतपूर्व यशामुळे आमची जवाबदारी आणखी वाढली असून यापुढेही राज्याच्या विकासासाठी अखंड कार्यरत राहू अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेचे आभार मानले. जनतेनं दाखवलेल्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही असं फडणवीस म्हणाले.

या पत्रकार परिषदेनंतर भाजपाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले

**कॉंग्रेस प्रतिक्रिया**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल अविश्वसनीय आणि अनपेक्षित आहेत; आम्ही याबद्दल विचार करू. अभ्यास करू आणि जनतेपुढे जाऊ, असं मत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत व्यक्त केलं.

**उद्धव ठाकरे**

विधानसभेचे निकाल अनपेक्षित आणि अनाकलनीय असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. ते मुंबईत मातोश्री इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. ते म्हणाले,

**नांदेड लोकसभा**

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे प्राध्यापक रवींद्र चव्हाण 1457 मतांनी विजयी झाले आहेत. त्यांनी भाजपाचे डॉ. संतुक हंबर्डे यांचा पराभव केला.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देश-परदेशातील जनतेशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 116 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**सर्व पक्षीय बैठक**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज सर्व पक्षीय बैठक बोलावली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. अधिवेशनादरम्यान संसदेच्या दोन्ही संभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांना आवाहन करण्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज उद्यापासून सुरू होणार असून ते 20 डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे. या अधिवेशनादरम्यान 26 नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जाणार आहे; त्या दिवशी संसदेचं सत्र होणार नाही.

**इफ्फी**

गोव्यात सुरू असलेल्या 55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात रसिकांना देश परदेशातील दर्जेदार चित्रपटांची मेजवानी मिळत आहे. कालच्या एका सत्रात “पॉवर ऑफ फेल्युअर” या विषयावर प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांनी आपले विचार मांडले. क्रिएटिव माइंड्स ऑफ टूमॉरो या उपक्रमातील सहभागी स्पर्धकांनी 48 तासात लघुपट तयार केला. या स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा आज होणार आहे.

**क्रिकेट**

बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात दुसऱ्या दिवसअखेर भारताला 218 धावांची आघाडी मिळाली आहे. यशस्वी जयस्वालच्या नाबाद 90 आणि के. एल. राहुलच्या नाबाद 62 धावांच्या जोरावर भारतानं दुसऱ्या डावात बिनबाद 172 धावा केल्या आहेत. तत्पूर्वी काल ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या 104 धावात आटोपला. कर्णधार जसप्रीत बुमराहनं पाच बळी घेतले, तर हर्षित राणानं तीन आणि मोहम्मद सिराजनं दोन गडी टिपले.

**हवामान**

कोकण वगळता राज्यात सर्वत्र किमान तापमान सरासरी 15 अंशांच्या आसपास आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**